ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!





## गोष्ट क्र.२६

**Education is not just about schooling.** शिक्षणाची आणखी व्यापक व्याख्या असायला हवी असं मला सतत वाटायचं. **Anthropolgy department** मध्ये मला एक **mentor** मिळाले. त्यांनी **education** या **static** शब्दापेक्षा **educating** ही **interaction** मध्ये घडणारी **process** आहे अशी संकल्पना मांडली. त्याच्यावरच्या विचारमंथनातून माझा विषय **educating in everyday living** असा झाला. शिक्षण हे फक्त शाळा किंवा शिक्षण संस्थेपुरतं मर्यादित नसतं. आपल्या रोजच्या आयुष्यात घडणारी प्रत्येक **interaction** ही आपल्यासाठी **instructive** असते. आणि हेच मला हवं होतं, याच्याच मी शोधात होते असं मला वाटलं. आपल्या इतरांबरोबरच्या **interactions** मधून एखादी संकल्पना कशी तयार होते? **How do we realise we don't know? Who do we select or allow to instruct us.** या अशा काही प्रश्नांमध्ये मला रस वाटू लागला.

देवयानी तीर्थळी
(१९८३-१९८९)

**माझ्यासाठी प्रबोधिनीच**

प्रबोधिनीच्या शिक्षणाचा विचार करताना विद्यार्थी म्हणून एक दृष्टीकोन आहे, आणि पुढे शिक्षण क्षेत्रातच काम करत असल्यामुळे त्याच्याशी निगडित असा दुसरा दृष्टीकोन आहे. विद्यार्थी म्हणून बोलायचं झालं तर मी ४थी पर्यंत महाराष्ट्र मंडळाच्या मराठी माध्यमाच्या शाळेत होते. माझं डोकं अगदी तिरकं चालायचं. रंग ओळखण्याच्या परीक्षेत मी पान हिरव्या च्या ऐवजी पिवळं रंगवलं होतं. शाळेमध्ये चाललेल्या गोष्टी डोक्याला खाद्य म्हणून पुरायच्या नाहीत. कंटाळा यायचा. एका पेपरातलं गणित खूप सोपं वाटलं म्हणून मी स्वतःला एक गणित घालून घेतलं आणि ते सोडवून आले, असं बऱ्याचवेळा व्हायचं. प्रबोधिनीत आल्यावर मात्र डोक्याला आणखी चालना मिळायला लागली, डोकं चालवायला विविध दिशा मिळायला लागल्या. ग्रंथालय हे त्यातल एक. मी भरपूर वाचायचे. मधल्या सुट्टीत, रस्त्यावर चालताना, बसमध्ये, सतत माझ्या हातात पुस्तक असायचं. एका डोळ्याने रस्त्यावर लक्ष ठेवून वाचायचे. आमचं एक गद्य-पद्य शिबिर झालं होतं आणि त्यात अनेक उतारे, कविता आम्ही पाठ केल्या होत्या. त्या आजही चटकन आठवतात. मी एका पुस्तकात सोयाबीनचं पनीर करतात असं वाचलं होतं आणि त्यावर प्रयोग करून पहिला होता, असं वाकड्या डोक्याचं मी काहीतरी करायचे, आणि त्याला वावच मिळत गेला. या अशा प्रयोगांमुळे कोणी कधी नापास केलं नाही, हे चुकतं आहे असं कधी कोणी म्हटलं नाही.

५वीत असताना प्रशालेत मुलांमधली कौशल्ये ओळखण्यासाठी काही उपक्रम घेतले जात असत त्यातल्या एका कथा कथनाच्या उपक्रमात मी सहभागी झाले होते. मी माझ्या आईने लिहिलेली गोष्ट सांगितली होती. ती थोडीशी भावनिक गोष्ट होती, डोळ्यात पाणी तरारेल अशी ती गोष्ट होती. मी लहानपणापासून वक्तृत्वात असल्याने मला प्रेक्षकांचा अंदाज होता. आणि गोष्टीच्या त्या भागात मी त्यांच्या भावना सावरायला जरा वेळ देण्यासाठी थांबले होते. त्याच्यामुळे मी वेळेच्या मर्यादेच्या बाहेर गेले. त्यामुळे निवडली गेले नाही आणि त्याच्यानंतर कधीच कुठल्याच वक्तृत्व स्पर्धेत मला सहभागी होता आलं नाही. माझा वक्तृत्वगुण संपूर्णपणे मारला गेला. त्या व्यक्तीच्या उत्तमता दाखवूनही मला बाद करण्याच्या निर्णयामुळे माझी ही बाजू कमकुवत झाली, मला लोकांच्या समोर येऊन बोलण्याची भीती निर्माण झाली. अजूनही काही वेळा मला या भीतीचा सामना करावा लागतो. या सगळ्या शाळेच्या उपक्रमांच्या ओघात जशा आपल्यामध्ये काही गोष्टी नवीन फुलतात तशा काही नकळत मारल्याही जातात.



आता educational professional म्हणून मागे वळून पाहताना विचार केला तर देवनागरीतून इंग्रजी शिकण्याचा जो प्रयोग प्रशालेत आम्ही असताना केला, तो शैक्षणिकदृष्ट्या उल्लेखनीय वाटतो. कविताताई, शीलाताई या आमच्या इंग्रजीच्या शिक्षिकांना मराठी यायचंच नाही. आम्हाला मराठी शिवाय दुसरं काही येत नव्हतं. आम्ही त्यांच्याशी संवाद करत I am a tea pot या कवितेपासून इंग्लिश दिनाला नाटुकलं करेपर्यंत मजल मारली. भाषा ही spoken language आहे. आपण त्याचं व्याकरण आणि लेखन आधी शिकतो त्यापेक्षा बोली पासून सुरुवात केली पाहिजे. आपण आपली मातृभाषा शिकतो तसंच बोली भाषेचे पैलू एकदा लक्षात आले की लिपी कधीही शिकता येते. अशी भाषा शिकल्याचे दूरगामी परिणाम हे खूप उत्तम दिसतात.

**आवडीचा अभ्यास**

शाळेच्या बाहेर पडल्यावर पुढे शाळेशी फार संबंध आला नाही. मला ९वीत असल्यापासून डेक्कन कॉलेजच्या भेटी नंतर Indology/archaeology करायच डोक्यात होतं. त्यामुळे मी ११वीत कला शाखेला प्रवेश घेतला. तेव्हा मला कमी मार्क पडले म्हणून कला शाखेत गेली असं लोकांनी गृहीत धरलं होतं. मला Indology हा विषय आवडायचा, मी त्याचं अवांतर वाचन करायचे. पण त्यात पदवी अभ्यासक्रम नसल्याने मी आधी अर्थशास्त्र विषयात फर्ग्युसन महाविद्यालयात ॲडमिशन घेतली. तेव्हा टिळक महाराष्ट्र विद्यापीठात Indology या विषयाचा अभ्यासक्रम शिकवला जातो असं सांगण्यात आलं. पण तिथे चौकशी केल्यावर तिथला या विषयाचा पदवीचा वर्ग बंद पडला होता. पण संस्कृत पदवी अभ्यासक्रमात दोन विषय Indology चे घेता येणार होते. मग फक्त मला Indology चे विषय शिकायला मिळावेत म्हणून मी संस्कृत विशारद किंवा B.A. संस्कृत करायचं ठरवलं. मला संस्कृत अजिबात आवडायचं नाही. १०वी पर्यंतचं संस्कृत कधीच आवडलं नाही. विसूभाऊ माझ्याकडून मागे लागून अभ्यास करून घ्यायचे. पण टिमवमध्ये गेल्यावर संस्कृत ही भाषा म्हणून शिकताना तिचे अनेक पैलू आणि त्यातलं सौंदर्य कळत गेलं आणि मला संस्कृत खूप आवडायला लागलं. अशी मी अर्थशास्त्र आणि संस्कृत

दोन्ही विषयांत एकाच वेळी पदवी घेतली. Indology चे विषय काही चालू झाले नाहीत पण तोपर्यंत आवड निर्माण होऊन वेदिक वाङ्मय या विषयात विशारद आणि पारंगतही केलं. रेडियोवर संस्कृत विषयाचे कार्यक्रम, संस्कृत नाटक अशा बऱ्याच उपक्रमांत नियमित भाग घेतला. All India Sanskrit conference मध्ये 'सुता हि जाता' या 'मुलगी झाली हो' या पथनाट्याच्या संस्कृत प्रयोगातही मुख्य भूमिका केली. माझं संस्कृतप्रेम सामान्य वाचकापर्यंत पोचावं या हेतूनी लोकमतमध्ये ९-१० महीने संस्कृत कणिका हे दैनिक सदरही लिहिलं.

टिमवीमध्ये संस्कृत शिकताना, उत्खनन, मंदिर कला आणि स्थापत्य अभ्यासासाठीचे दौरे अशा गोष्टी ही करत राहिले. हा सगळा प्रचंड खर्चिक मामला आहे असं माझ्या लक्षात आलं. मग त्यासाठी आपणच कमवायला हवं असा विचार करून एका स्थिर नोकरीसाठी मी MBA केलं. पुढे मार्केटिंग क्षेत्रात गती उत्तम असली तरी, फक्त पैसे मिळवण्यासाठी करत असल्यामुळे त्यात फार मन लागायचं नाही. अर्थात या पदवीमुळे मी नेता म्हणून, manager म्हणून उत्तम झाले. मग विविध इतर काम करत-करत Instructional design, online learning आणि corporate training या क्षेत्रात शिरकाव झाला. काम करत असले तरी learning science, instructional design या विषयाबद्दल आपल्याला काहीच theoretical base नाही, ते माहीत करून घ्यायला पाहिजे असं मला वाटायला लागलं. तेव्हा भारतात या विषयासंदर्भात काही अभ्यासक्रम उपलब्ध नव्हता. कामानिमित्त अशी अमेरिकेला जातच होते त्यामुळे तिथल्या अभ्यासक्रमाविषयी माहिती झाली होतीच. त्यामुळे मग मी अमेरिकेला जायचा निर्णय घेतला. आधीच माझ्याकडे दोन post graduations होते, त्यात तिसरं कशाला असा विचार करून Ph.D. करायच ठरवलं. हे कारण फारच बालिश होतं. संशोधकाचा पिंड असल्यामुळे मी ते पुढे निभावून नेऊ शकले. Now I make sure to deter students from taking such decisions.



**टिमवी मधील संस्कृत नाटकात सहभाग**

### विस्तारलेलं क्षितिज आणि नवी आव्हाने

Columbia University मध्ये २००५ साली स्कॉलरशिप मिळाली आणि मी न्यूयॉर्कमध्ये दाखल झाले. इतक्या प्रकारच्या गोष्टी तिथे उपलब्ध होत्या. प्रत्येक विद्या शाखांची ग्रंथालयं; अनेक संग्रहालयं, संस्था यांना मोफत भेटी देण्यासाठीची सवलत आम्हाला विद्यापीठाकडून मिळालेली होती. नाटक, संगीत, कला प्रदर्शनं फुकट बघता येत होती. यूनायटेड नेशन्समध्ये भेट देणाऱ्या अनेक वेगवेगळ्या देशांमधल्या नेत्यांची भाषणं कोलंबियामध्ये असायची. एका वेगळ्या देशात जाऊन राहणं या गोष्टीमुळेच खरंतर आपण खूप शिकतो. त्यात अशा संधीही आयत्या चालून आल्या.

जेव्हा मी न्यूयॉर्कला गेले तेव्हा दोन बॅगा घेऊन गेले होते, माझ्याकडे घर नव्हतं. एक मुलगा तीन दिवसाच्या सुट्टीला गेला होता. तात्पुरतं त्याच्या खोलीत राहून मला तीन दिवसात घर शोधायचं होतं. भारतात मला मोठ्या पगाराची नोकरी होती, माझं लग्न झालेलं होतं, मी अत्यंत स्थिरस्थावर होते आणि अशा परिस्थितीतून मी एका संपूर्ण वेगळ्या वातावरणात जायचा निर्णय घेतला. मला त्या तीन दिवसात एक खोली मिळाली, ती खूप लहान होती. बिस्तरा उघडला तर दार उघडणार नाही अशी गंमत, खायची प्यायची व्यवस्था स्वतःची स्वतः करायला लागणार होती. I was at the lowest of the low on the social ladder. First of all, I was a student, that too an international student, I did not have a good financial backing either. अभ्यास करताना वेगळ आव्हान होतं कारण कॉर्पोरेटमध्ये काम केल्यावर परत academia त शिरणं अवघड होतं. अशा वेळेला सगळा ego बाजूला ठेवावा लागतो तरच आपण तग धरू शकतो, It was a process of reinventing myself. कमीत-कमी पैसे, साधनं मिळवून स्वयंपाक करायचा, अभ्यासासाठीच्या वेळेतून वेळ काढून कसरत करावी लागायची. पण या सगळ्या वेळात मी काही हालाखीचे दिवस काढले असं मला कधीच वाटलं नाही. तो वेळही मी अगदी मनापासून enjoy केला असंच मला आठवतं आहे. परदेशातले अनुभव हे फक्त curricular नसतात तर तुम्ही त्या वेगळ्या जीवनपद्धतीमुळे स्वतःबद्दल अनेक गोष्टी शिकता. अनेक गोष्टी आपण अध्यारूत धरतो. आपण कोण आहोत, माझ्या क्षमता, माझे विचार काय आहेत, हे सगळं आपल्याला आपल्या देशातून, शहरातून बाहेर गेल्यावर जास्त जाणवतं, स्पष्ट होत जातं.

**घेणाऱ्याने घेत जावे**

माझ्या डोक्यात मी एक संशोधनाचा आराखडा ठेवून तिथे गेले होते, पण तिथे मला ज्ञानाचं भांडारच खुलं झालं. अनेक नवीन-नवीन विषयांशी माझा परिचय झाला. माझा प्रोग्रॅम प्रोफेशनल डॉक्टरेट असल्यामुळे आम्हाला या विषयाच्या खोली बरोबरच breadth ही अपेक्षित होती. सर्वसामान्यतः जो अभ्यासक्रम ४५ किंवा ६० points चा असतो तो आमच्यासाठी ९० points चा होता. शिकायला मोठं भांडारच समोर होतं. Teacher's college, Columbia university हे सर्वात मोठं school of education आहे. Education चा सर्व अंगानी विचार करणारे भरपूर विभाग यात आहेत. मग अनेक विभागांमध्ये अनेक नव्या गोष्टी शिकून घेतल्या, मला नक्की काय हवं आहे याचा सतत विचार आणि शोध चालू होता आणि सरतेशेवटी मला ते Anthropology of Education या विभागात गवसलं.



**With mentor HerveVarenne**

Education is not just about schooling. शिक्षणाची आणखी व्यापक व्याख्या असायला हवी असं मला सतत वाटायचं. Anthropolgy department मध्ये मला एक mentor मिळाले. त्यांनी education या static शब्दापेक्षा educating ही interaction मध्ये घडणारी process आहे अशी संकल्पना मांडली. त्याच्यावरच्या विचारमंथनातून माझा विषय educating in everyday living असा झाला. शिक्षण हे फक्त शाळा किंवा शिक्षण संस्थेपुरतं मर्यादित नसतं. आपल्या रोजच्या आयुष्यात घडणारी प्रत्येक interaction ही आपल्यासाठी instructive असते. आणि हेच मला हवं होतं, याच्याच मी शोधात होते असं मला वाटलं. आपल्या इतरांबरोबरच्या interactions मधून एखादी संकल्पना कशी तयार होते? How do we realise we don't know? Who do we select or allow to instruct us. या अशा काही प्रश्नांमध्ये मला रस वाटू लागला.



**Graduation**

अशा या सगळ्या विषयांचे प्रवाह बदलत-बदलत शिक्षण या संकल्पनेच्या एका व्यापक अभ्यासापाशी मी येऊन ठेपले, आणि गेली बारा वर्षं मी या स्पेसिफिक पद्धतीने या विषयाचा अभ्यास किंवा तपश्चर्याच करत आहे असं म्हणायला हरकत नाही. प्रबोधिनीमधील इतर काही लोकांसारखी शिक्षण क्षेत्र ही आयुष्याची दिशा मी आधीपासून ठरवलेली नव्हती. जसं-जसं मला स्वतःबद्दल आणि विषयाबद्दल clarity येत गेली तसा मार्ग मी शोधत गेले. पण जरी मी कुठल्याही विषयाची सुरुवात ही अपघात म्हणून केलेली असली, तरी हेच आपल्या आयुष्याचं ध्येय आहे असं मानून प्रत्येक गोष्ट केली, त्यात कधीही कष्ट कमी केले नाहीत. आणि शिकलेल्या, अनुभवलेल्या प्रत्येक क्षेत्राचा प्रभाव माझ्या विचार करण्यात आणि कामात असतो.



**Doctoral Cohort**

**बहुआयाम**

माझ्या Ph.D. च्या प्रवासात दिशा शोधताना मी वेगवेगळ्या disciplines च्या research methodology चा अभ्यास केला होता. इतर संशोधकांबरोबर काम करताना मी या सगळ्याचा एकत्रित विचार करू शकते असं माझ्या लक्षात आलं. Traditional संशोधन पद्धती सोडून



**With Susan Lowes Peiyi Lin -**
**Institute For Learning Technologies**



**Research Lab**

मी नव्या पद्धतींचा विचार करू शकते. संशोधनाची philosophy कृतीरूप कशी आणता येईल हे काम मला चांगलं जमतं. एखादा विषय विविध अंगाने कसा बघता येईल हा skillset माझ्याकडे या सगळ्या प्रवासामधून आला असं मला वाटतं. उदाहरण द्यायचं झालं तर, Teachers College मधल्या शिक्षणाचं अर्थशास्त्र या विभागातील कॉस्ट-बेनिफिट ॲनॅलिसिस सेंटर मधील एक संशोधिका Massive Open Online Course (mooc) या त्यावेळी नवीन असलेल्या विषयावर संशोधन करावं असा विचार करत होत्या. मी तंत्रज्ञान आणि शिक्षण या विभागात काम करत असल्याने त्या माझ्याशी बोलायला आल्या. यात कॉस्ट कोणाला, फायदा कोणाला आणि कोणता अशा प्रकारचे विविध अंगानी प्रश्न विचारल्यावर, यातील कॉस्ट ही पैशातच न मोजता समाज, शिक्षणसंस्था यांना होणारे इतर फायदे तोटे, elite universities चं वर्चस्व आणि त्याचे दूरगामी परिणाम असे बरेच पैलू समोर आले. मग त्याचं पठडीबाज संशोधन न करता या क्षेत्राचा विविध अंगानी आढावा घेण्याचं ठरलं. नंतर, रिपोर्ट, विविध संशोधन निबंध, पुस्तक इत्यादि मधून ते काम बरच पुढे गेलं. असा प्रत्येक गोष्टीकडे सर्वांगीण पद्धतीने बघण्याचा आणि संशोधनाच्या विविध पद्धती वापरून विचार करण्याचा, मला multidisciplinary रिसर्च टीम बरोबर काम करताना ही उपयोगी होतो.





**उपयोजन**

तीन वर्षांपूर्वी पुन्हा भारतात आल्यावर मी या गोष्टी डोळ्यासमोर ठेवून काम करायचं असं ठरवलं. सध्याच्या माझ्या कामाबद्दल सांगायचं झालं तर आत्ता माझं संपूर्ण लक्ष हे Research Design/Methodology Consultancy वर आहे. पूर्वी मी कोलंबिया आणि ब्राऊन university मध्ये काम करताना हे parallelly करायचे पण आता मी फक्त या consultancy चं काम करते. या consultancy च्या माध्यमाने Ph.D करणाऱ्या विद्यार्थ्यांना मी research methodology बद्दल मार्गदर्शन करते. बऱ्याचदा quantitative data analysis करणं सगळ्यांना माहित असतं पण जेव्हा qualitative data बरोबर काम करायचं असतं त्याच्यासाठी मी मदत करते. Research Design पासून publication पर्यंत जिथे लागेल तिथे मी त्यांना मदत करते. नुसती पदवी मिळावी म्हणून Ph.D करणाऱ्या विद्यार्थ्यांना मी उभंपण करत नाही. कष्ट करण्याची आणि संशोधन पद्धती शिकण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांना मात्र मी काहीही हातच न राखून ठेवता guide करते. दुसरा गट म्हणजे मी संशोधकांबरोबर काम करते. ज्यांना स्वतःच्या disciplin specific methodology पलीकडे जाऊन काहीतरी वेगळं करायचं आहे त्यांना मार्गदर्शन किंवा त्यांच्याबरोबर काम करून नवीन प्रश्नाला साजेशा संशोधनाच्या पद्धती शोधणं, तयार करणं हे आहे. तिसरा गट म्हणजे NGO. वेगवेगळ्या संस्था खूप चांगलं काम करतात. पण त्यांना on ground काम करायचं असतं. या कामाला research ची जोड देण्याचा मी प्रयत्न करत असते. त्यांनी योजलेल्या उपक्रमातून त्यांचा हेतू साध्य होतो आहे ना हे शोधण्यासाठी त्यांच्या कामाचं अनेक बाजूंनी मूल्यमापन, documentation या सगळ्यात मी त्यांच्याबरोबर काम करते. मी एका संस्थेबरोबर स्वयंसेवी वृत्तीने काम करते आहे. global south मधील संशोधकांना त्यांचं काम जागतिक पातळीवर नेता यावं, आंतरराष्ट्रीय प्रकाशनामध्ये प्रसिद्ध करता यावं यासाठी मार्गदर्शन करायचे काम करते.



**Research Methodology Workshop**

**शैक्षणिक धोरणावरचे विचार**

NEP मध्ये बऱ्याच exciting गोष्टी आहेत. पण त्यातल्या higher education मध्ये inter disciplinary शिक्षणाबद्दल बराच विचार केलेला दिसतो. तो मुद्दाम उल्लेख करण्यासारखा आहे. वेगवेगळ्या शाखांनी एकमेकांशी संवाद साधणं, शिक्षक प्रशिक्षण केन्द्र हे विद्यापीठाला जोडलेले असावे असे काही हे खूप महत्त्वाचे मुद्दे यावेळी मांडलेले आहेत. सध्या विषय आणि शाखा खूप बंदिस्त झालेल्या आहेत. त्या बंदिस्त परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी ही पॉलिसी प्रोत्साहन देते आहे. सायन्सला गेलं की तुम्हाला social sciences चं ज्ञान नसतं किंवा कला शिकायला वाव नसतो. Maths मध्ये तुमचं logic build होतं

जे arts किंवा social sciences आणि humanities करणाऱ्या लोकांना उपलब्ध नसतं हे सगळे तुकडे जर आपल्याला जोडता आले तरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल. हे काम करणं तसं सोपं नसणार आहे. अमेरिकेत विद्यापीठांनी आंतर विद्याशाखीय संशोधन करावं आणि नवीन विषय तयार करावे यासाठी long tern बरच funding उपलब्ध होतं आणि तरीही म्हणावं तेवढं साध्य झालं नाही. त्यामुळे असं वाटतं की आत्ता असलेल्या शैक्षणिक संस्थांमध्ये अशा प्रकारची रचना उभी करणं हे तसं अवघड काम आहे. पण NEP मध्ये हे शब्दबद्ध झालं आहे त्याचा खूप आनंद आहे.

शाळेमधून बाहेर पडल्यावर खूप वेगळ्या जगात गेल्यासारखे वाटते. प्रबोधिनीत असताना तुम्ही खूप सुरक्षित वातावरणात असता. त्या cuckoon मधून बाहेर पडल्यावर नवीन गोष्टी शिकाव्या लागल्या. मला कधीच मी मुलगी आहे मग आता काय करायचं असा प्रश्न पडला नव्हता. कायम जायचं आणि करायचं असाच स्वभाव होता. प्रबोधिनीत विविध उपक्रमांमधून, जसे की सती प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी केलेला राजस्थान अभ्यासदौरा असेल, दुष्काळात शिवगंगा खोऱ्यातले काम असेल असं exposure खूप मिळालं होतं. त्यामुळे प्रत्येक गोष्ट उघड्या डोळ्यांनी बघता येण्याची सवय लागली. जेव्हा आपण भारतात असतो तेव्हा आपल्याला बऱ्याच गोष्टी जाणवत नाहीत. तिथून बाहेर पडल्यावर एक bird eye view मिळत गेला.

**स्व–ओळख आणि स्वयंप्रेरणा**



**Potluck Dinners**

या सगळ्या प्रवासात अनेक अडचणी येत राहतात आणि त्यांच्यावर मात करावी लागते. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे स्वत:ला गाजर दाखवत रहायचं. स्वतःसाठी स्वतःच external motivation तयार करत रहायचं. माझा मुळातच स्वभाव प्रत्येक अनुभव curiosity नी समजून घेण्याचा आहे. म्हणजे मला COVID झाला होता तेव्हा मला वास येत नव्हता, त्याचं मी बारकाईनं निरीक्षण केलं आणि तेही मी enjoy केलं. त्याच्यामुळे अडचणी या अडचणी म्हणून कमी वाटतात. This might be a learnt behaviour as my mother has a similar way of thinking. USA ला असताना बऱ्याचदा तिथलं हवामान, हातात असणारे पैसे याचं tension यायचं. पण तेव्हा ते जाणवलं आणि त्याचा माझ्या शरीरावर आणि मनावर परिणाम होतो आहे असं लक्षात आल्यावर लगेचच त्याच्यावर समुपदेशन घेतले आणि तो ताण कशामुळे येतो आहे हे शोधून त्याच्यातून बाहेर यायचा मार्ग शोधून काढला. प्रत्येक अडचण ओळखायची, कोणाचीतरी मदत घ्यायची आणि स्वतःचं coping structure develope करायचं. यातलाच एक उपाय म्हणून आम्ही सगळ्या international students, potluck dinners करायचो. प्रत्येक व्यक्तीने काहीतरी त्यांच्या संस्कृतीतला पदार्थ आणायचा आणि मग रात्र-रात्र जागून गप्पा मारायचो. हिवाळ्यात दिवस लहान असतो त्यावेळी सगळ्यांनाच त्रास व्हायचा. त्यांची जीवन पद्धती, त्यांचे विचार समजून घ्यायला मिळायचे. आम्ही सगळे एकमेकांचा आधार घ्यायचो. आपली संस्कृती आणि कुटुंब या विषयावर गप्पा मारल्यामुळे एक खूप छान/deep/long lasting नातं तयार होत जातं.



**Games Learning**

Thesis writing and overall last few semesters is a lonely and difficult stage of a Ph.D. या दरम्यान कॅम्पस वरचा pottery studio सापडला. आणखीन एक coping चं साधन मिळालं. मातीला आकार देताना मनातल्या विचारांचा गुंता सुटतो असं लक्षात आलं. पीएचडी नंतरही हे चालू ठेवलं. बागकामची आवड होतीच त्यात मातीच्या संपर्काची आणखीन एक भर पडली.







**छंदातून ऊर्जा**



बऱ्याच दिवासांनी आता माजी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्तानी पुन्हा एकदा वैयक्तिक आणि कामाच्या अशा दोन्ही पातळ्यांवर मी प्रबोधिनीशी जोडली गेले. मेळाव्यासाठी पुण्यात आलेली असताना गौरीताई कापरे यांच्याबरोबर हराळीला गेले. गौरी माझी बालमैत्रीण आहे. तिच्या घरी जायचं म्हणून गेले होते. वाटेत अभिजीत आणि गौरी बरोबर भरपूर गप्पा झाल्या. दोन दिवस हराळीचं काम पाहिलं आणि हे काम मला खूप आवडलं. दोन दिवसातच मला अनेक गोष्टी अशा दिसल्या ज्यांचं documentation व्हायला हवं आहे. आणि मग मी हराळी केंद्रासाठी काम करायला सुरुवात केली. सध्या कोरोनामुळे शाळा बंद आहेत. त्यामुळे हराळी जवळच्या तांड्यावर आनंदशाळा सुरू केल्या आहेत. त्याचा अभ्यास करण्याचं काम चालू आहे.





**हराळी येथे चालणाऱ्या छोट्या आणि मोठ्या गटांचे निरीक्षण करताना**

तरुण विद्यार्थ्यांना मला एक नक्की सांगायला आवडेल. Step away from your current Life, city, workspace. त्याच्यातून तुमची स्वतःशी नव्याने ओळख होते. नवीन संस्थांबरोबर काम करायचा प्रयत्न करा. स्वतःचं क्षेत्र सोडून आणखी काय explore करता येईल याचा विचार करा. जेव्हा life changing events तुमच्या आयुष्यात होतात, त्यातून तुम्हाला नव्याने स्वतःची ओळख होते. अगदीच बदल शक्य नसेल तर एक महिनाभर तरी कुठेतरी बाहेर पडा. काहीतरी वेगळं करून पहा. आयुष्याच्या जबाबदाऱ्या येण्याच्या अगोदर आयुष्य नव्याने जगून पहा.

## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट – हरिश्चंद्राची फॅक्टरी

२. आवडतं पुस्तक – Ignorant schoolmaster, Ranciere

३. छंद – स्वतःची भाजी पिकवणे

४. पहिली प्रतिक्रिया

- NEP - exciting पण नक्की होणार का असा प्रश्न पडतो
- शिक्षक – mentor
- शिक्षण क्षेत्र– bureaucracy
- ज्ञान प्रबोधिनी– मेघडंबरी

पुन्हा एकदा आयुष्य जगायची संधी मिळाली तर जे काही समोर येईल ते मनापासूनच करेन. मला Indology करायला अजूनही नक्की आवडेल.

**देवयानी तीर्थळी**
**devayani.tirthali@gmail.com**

**मुलाखत – चिन्मयी खरे, ईशा कान्हेरे** **शब्दांकन – चिन्मयी खरे**

**संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org